कोर्ट विद्यमान श्रीमती उषा चौधरी, तहसीलदार, ब्रम्हपुरी यांचे कार्यालय

रा.मा.क्रं.12/एन.ए.पी.34/2021-2022

मौजा:- **नवेगांव मक्ता** तालुका:- **ब्रम्हपुरी**

**EQJ Court No. 00240/2021**

**आदेश**

**(दिनांक 31 डिसेंबर, 2021 रोजी पारित)**

ज्याअर्थी अर्जदार **सौ. अंजली आशिष करंडे व इतर 1 रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** हे सद्यस्थितीत मौजा **नवेगांव** मक्ता ता.ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर येथील प.ह.नं.6 , गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29** हे.आर जमा रुपये 1.10, भोगवटदार वर्ग 1 कृषक जमीन धारक आहे. ही जमीन त्यांना खरेदी हक्काने प्राप्त झालेली असुन सदयस्थितीत अर्जदार हेच जमीनीचे मुळ मालक आहेत. यापूर्वी विषयांकीत जागा अकृषक करण्याबाबत श्री रामदास दशरथ नाकतोडे व इतर रा. नवेगांव मक्ता ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांनी **निवासी** प्रयोजनार्थ अकृषिक करण्याकरीता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम - 44 नुसार विहीत नमुन्यात या कार्यालयास दिनांक 05.05.2021 ला अर्ज सादर केल्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यांत येऊन प्रकरणांत कार्यवाही सुरु करण्यांत आली. सदर जागा श्री रामदास दशरथ नाकतोडे व इतर रा. नवेगांव मक्ता ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांनी दस्त क्रमांक 1536 दिनांक 03.12.2021 रोजी अर्जदार यांना नोंदणीकृत विक्रीपत्रान्वये विक्री करुन दिलेली आहे. सदर विक्रीपत्राचे आधारे अर्जदाराचे नांवाने अभिलेखात दुरुस्ती झालेली आहे.

अर्जदार यांचे मौजा **नवेगांव मक्ता** तहसील ब्रम्हपुरी येथील गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29 हे.आर** भो.वर्ग 1 जमीनीचे **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी मिळण्याकरीता या कार्यालयास सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाकडुन दिनांक 11.05.2021 रोजी जाहिरनामा काढुन विहीत मुदतीत आक्षेप / हरकती मागविण्यांत आल्या. परंतु मुदतीमध्ये कोणाकडुनही आक्षेप किंवा हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

अर्जाचे अनुषंगाने खालील विभागाकडुन उपरोक्त कृषक जमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषक करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. 808 व 809 दिनांक 11.05.2021 अन्वये अभिप्राय / नाहरकत प्रमाणपत्र मागविण्यांत आले.

1. सहाय्यक संचालक, नगर रचना, चंद्रपुर
2. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली
3. कार्यकारी अभियंता, अऊदा बांधकाम विभाग म.रा.वि.पा.कं. मर्या. चंद्रपूर
4. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या. ब्रम्हपुरी
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.चंद्रपुर
6. उपजिल्हाधिकारी (पुर्नवसन) चंद्रपुर
7. उपजिल्हाधिकारी भुसंपादन(सामान्य) चंद्रपुर
8. मंडळ अधिकारी , ब्रम्हपुरी / तलाठी साजा क्रं. 6 कुर्झा
9. सरपंच / सचिव ग्रामपंचायत कोथुळना मक्ता ता.ब्रम्हपुरी

सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपुर यांचे पत्र जा.क्र.अकृषी/अंतिम मंजुरी/मौ.नवेगांव मक्ता / ता.ब्रम्हपुरी/ससंनरचं/ 2377 दिनांक 23.11.2021 अन्वये अभिन्यासाला खालील अटी व शर्तीवर निवासी प्रयोजनाकरीता अंतीम मंजुरीची शिफारस केलेली आहे.

1. विषयांकीत जागेतुन विदयुत वाहिनी जात असून सदर विदयुत वाहिनी अदयाप स्थानांतरीत झालेली नसल्याने सदर विदयुत वाहिनीमुळे बाधित होणारे भुखंड क्र. 1 हया भुखंडाची विक्री सदर विदयुत वाहिनी स्थानांतरीत केल्याशिवाय विक्री करता येणार नाही.
2. अभिन्यासातील खुली जागा करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरिक्त संपुर्ण अभिन्यासातील भुखंडाचा उपयोग फक्त निवास वापराकरीताच करण्यांत यावा.

तहसिलदार ब्रम्हपुरी

3. भविष्यकाळात पुढे अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन करु नये.
4. सार्वजनिक उपयोगाकरीता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा वापर त्याच वापराकरीता करण्यांत यावा.
5. अभिन्यासातील खुली जागा, रस्ते, लहान पुल, नाल्या, विद्युत व पिण्याचे पाणी व्यवस्था ईत्यादीचा विकास 1 वर्षाच्या आंत करुन ते व्यवस्थापनाकरीता विधीवत ग्राम पंचायत **कोथुळणा मक्ता** (स्थानिक प्राधिकरण) कडे हस्तांतरीत करावे लागेल. तद्नंतरच मंजुर अभिन्यासातील भुखंड विकता येतील.
6. अभिन्यासातील रस्ते, खुली जागा इत्यादी सार्वजनीक मालमत्ता म्हणून संबोधल्या जाईल व त्याचा उपयोग शेजाऱ्यांना अबाधित राहील.
7. अभिन्यासातील कोणत्याही भुखंडावर विकास / बांधकाम करतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या तरतुदी नुसार सक्षम अधिकारी यांची मंजुरी/परवानगी घेणे आवश्यक राहील.
8. इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाचे नियमाचे पालन करावे.
9. विषयांकीत जागेत काही वृक्ष असल्यास, भुखंड आखतांना ती नष्ट न करता विदयमान स्थितीत कायम ठेवावी.
10. मंजुर अभिन्यासातील रस्त्याचे कडेला दोन्ही बाजुने प्रत्येकी 10.00 मी.अंतरावर वृक्षारोपण करणे आवश्यक राहील.
11. उक्त नियमावलीतील तरतुद क्र. 3.6 नुसार महाराष्ट्र विद्युत वितरण विभागाकडून सदर प्रकरणी इलेक्ट्रीक सबस्टेशन (Electric Sub-Station) करीता भुखंड प्रस्तावित करणे आवश्यक राहील किंवा कसे याबाबतची खातरजमा करुन त्यानुसार योग्य स्थानावर किमान आवश्यक क्षेत्राचे भुखंड प्रस्तावित करणे आवश्यक राहील.
12. उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4 नुसार विकासकर्ते यांनी सदर प्रकल्पाकरीता लागणारा Grey Water Treatment Plant (GWTP) चे क्षमताबाबत परिगणा व अंमलबजावणीचे विवरण अंतिम मंजूरीपुर्वी नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच प्रस्तावित अभिन्यासात Grey Water Treatment Plant करीता दर्शविलेल्याप्रमाणे भुखंडावर GWTP बांधून उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4.1(iv) नुसार GWTP देखभाल करणे आवश्यक राहील.
13. उक्त नियमावलितील तरतुद क्र. 13.4.1(ii) नुसार सदर अभिन्यासातील जल व मल निसारण करीता Plumbing Line, Draining Line, Chambers हे वेगळया रंगाने दर्शवून Service Paln मंजूरी करीता नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक राहील.
14. विषयांकीत अभिन्यासाच्या हददी, मोजमापे, क्षेत्रफळ, मालकी हक्क याबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्यानुसार अर्जदार यांनी सुधारीत अभिन्यास मंजूर करणे बंधनकारक राहील.
15. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलितील तरतुद क्र. 2.7.2 नुसार अभिन्यासा अंतर्गतची करावयाची विकास कामे जसे रस्ते, गटारी, पाणीपुरवठा व्यवस्था, विदुयत दिवे व्यवस्था, खुल्या जागेचा विकास करणे विकासकास बंधनकारक राहील.
16. उक्त जागेच्या मालकीहक्काबाबतची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
17. सदरहू प्रकल्पाची महारेरा अधिनियम, 2006 अंतर्गत नोदंणी करणे अर्जदार / विकासक यांना बंधनकारक राहील.

कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जावक क्रमांक 2214/ तां.-3/आरे/2021 दिनांक 07.10.2021 अन्वये अर्जदारास नवेगांव मक्ता तहसिल ब्रम्हपुरी येथील गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29** हे.आर जागेस निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्यांस खालील अटीवर नाहरकत /अभिप्राय सादर केलेले आहे.

रा.मा.क्र.12/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- **नवेगांव मक्ता** तालुका:- **ब्रम्हपुरी**
**EQJ Court No. 00240/2021**

1. शासकीय रस्त्यापासून सदर भुखंडापर्यंत पोचमार्ग तयार करणे पुर्वी अर्जदाराने या विभागाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. पोचमार्ग अर्जदाराने स्वखर्चाने बांधणे आवश्यक आहे. मुख्य रस्त्याच्या उंचीपेक्षा पोचमार्गची उंची जास्त ठेवता येणार नाही.
2. मुख्य रस्ता व पोचमार्ग यांचे जंक्शनवर अर्जदाराने या कार्यालयाची परवानगी घेवून आवश्यक मोरीचे बांधकाम स्वखर्चाने करावे. याकरीता वेगळे प्रस्ताव सादर करावेत.
3. उपरोक्त प्रकरणी रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालय यांची वरील प्रयाेजनार्थ् प्रस्ताव असल्यास पोच मार्गासाठी वेगळी परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक असून महामार्गास खाजगी जमिन लागून आहे. त्याकरीता पोचमार्गाचे प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे.
4. शासकीय रस्त्याच्या हददीत कोणत्याही प्रकारचे फलक उभारण्यात येवु नये.
5. राष्ट्रीय महामार्गाच्या मध्ये रेषेपासून 37.00 मी. पर्यंत अंतरापर्यंत बांधकाम करण्यात येवु नये.
6. ले-आऊट नकाशात नियंत्रण (37.00 मी.) रेषेपावेतो लाल रंगाने दर्शविलेली जागा वगळून आदेश पारित करण्यात यावे.
7. Building by law's नुसार आवश्यक सुरक्षित अंतर ठेवावे. याकरीता ले-आऊट नकाशाची प्रत ग्राहय समजण्यात यावी.
8. प्रस्तावित भुमापन क्रमांक 82 ची जागा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत पाटबंधारे विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे अर्जदारास बंधनकारक राहील.
9. निवासी प्रयोजनार्थ स.क्र. 82 ही जमीन इतर प्रयोजनार्थ वापरावयाची झाल्यास वेगळा प्रस्ताव सादर करावा.
10. अर्जदाराने वरील अटी व शर्तीचे पालन न केल्यास सदर नाहरकत अभिप्राय रदद समजण्यात यावे.

मंडळ अधिकारी, ब्रम्हपुरी व तलाठी साजा क्रमांक 6 कुर्झा यांनी त्यांचे दिनांक 19.05.2021 रोजी दिलेल्या अहवालाप्रमाणे अर्जदारास मौजा नवेगांव मक्ता गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29** हे. आर. जमीन **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपुर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.आरोग्य/ नाहप्र 85/2021 दिनांक 31.05.2021 अन्वये मौजा नवेगांव मक्ता ता.ब्रम्हपुरी येथील गट नंबर 82 आराजी **0.43** हे. आर. पैकी 0.29 हे. आर. जमीन **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन) चंद्रपुर यांचे कार्यालयीन पत्र क्र.कार्या-6/पुनर्वसन/क.लि./2021/241 दिनांक 01.06.2021 तसेच भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांचे कार्यालयीन पत्र क्र.कावि/ उविअ/अ.का./भु.सं./2021/363 दिनांक 10.06.2021 अन्वये दिलेल्या अहवालानुसार मौजा नवेगांव मक्ता ता.ब्रम्हपुरी येथील गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. पैकी **0.29** हे. आर. जमीन **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता अऊदा प्रकल्प विभाग मराविपाकं.मर्या, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र. का.अ./अउदा/प्रकल्प/विभाग/चंद्र/तां/1359 दिनांक 27.07.2021 अन्वये दिलेल्या अहवालानुसार मौजा नवेगांव मक्ता ता.ब्रम्हपुरी येथील गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29**हे. आर. जमीन **निवासी** प्रयोजनार्थ अकृषक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता मराविविकं मर्या., ब्रम्हपुरी यांना पत्र, स्मरणपत्र देऊनही त्यांचे अभिप्राय या कार्यालयास प्राप्त न झाल्याने त्यांची उक्त जागा अकृषक करण्यास काहीही हरकत नसल्याचे समजण्यात येत आहे. तथापी अर्जदार यांना भारतीय विद्युत नियम 1956 च्या तरतुदी लागु राहतील.

रा.मा.क्र.12/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- नवेगांव मक्ता तालुका:- ब्रम्हपुरी
EQJ Court No. 00240/2021

सरपंच/सचिव ग्राम पंचायत कोथुळणा (मक्ता) यांनी त्यांचा अभिप्राय सादर केलेले असुन सोबत ठराव क्रमांक 09 दिनांक 18.05.2021 ची प्रत सादर केलेली असुन **निवासी** अकृषक परवानगीबाबत नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

त्याअर्थी, **मी तहसीलदार, ब्रम्हपुरी** महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,1966 चे कलम-44 नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन अर्जदार **सौ. अंजली आशिष करंडे व इतर 1 रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** यांना त्यांचे मालकी व कब्जातील मौजा नवेगांव मक्ता येथील गट नंबर **82** आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29** हे. आर. जागेला मोजणी मामला क्रं. 59 दिनांक 25.10.2021 चे सिमांकीत मोजणी नकाशानुसार 2900.00 चौ. मि. कृषक जमीन निवासी प्रयोजनार्थ **अकृषक करण्यांस** खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मान्यता देत आहे.

**AREA STATEMENT :**

| | | |
|---|---|---|
| 1 | AREA OF PLOT | 4300.000 SQ.MT. |
| a | AS PER OWNERSHIP DOCUMENT | 4300.000 SQ.MT. |
| b | AS PER MEASURMENT SHEET | 4300.000 SQ.MT. |
| c | AREA UNDER LAYOUT | 2900.000 SQ.MT. |
| 2 | DEDUCTION FOR | |
| a | PROPOSED D.P./D.P./R.P.ROADS WIDENING AREA/SERVICE/HIGHWAY WIDENING | 510.000 SQ.MT. |
| b | ANY RESERVATION | 0.000 |
| | Total Deductions (a+b) | 510.000 SQ.MT. |
| 3 | BALANCE AREA OF PLOT (1-2) | 2390.000 SQ.MT. |
| 4 | AMINITY SPACE (IF APPLICABLE) | 0.000 SQ.MT. |
| 5 | NET AREA OF PLOT (3-4) | 2390.000 SQ.MT. |
| 6 | RECREATIONAL OPEN SPACE (IF APPLICABLE) | 0.000 SQ.MT. |
| 7 | INTERNAL ROAD AREA | 866.095 SQ.MT. |
| 8 | SERVICE ROAD ANDHIGHWAY WIDENING | 0.000 |
| 9 | PLOTABLE AREA | 1523.905 SQ.MT. |

**मौजा** नवेगांव मक्ता ता.ब्रम्हपुरी येथील गट नंबर **82** आराजी 0.43 हे. आर. **पैकी 0.29** हे. आर. म्हणजेच 2900.00 चौ. मि. जागेमधील वर नमुद रस्त्याखालील आराजी 510.00 चौ.मि., 866.095 चौ.मि. जागा वगळता निव्वळ 7 निवासी भुखंडा खालील आराजी 1523.905 चौ. मि. जागेवर भुखंड निहाय अकृषक व त्यावरील उपकराची आकारणी करण्यांत येत आहे.

**SCHEDULE OF PLOTS (As per layout plan) :**

| Sr.No. | Plot. No. | Area of each Plot in Sq. Mt. | Assessment Rs. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 1 | 681.363 | 34.00 |
| 2 | 2 | 153.600 | 8.00 |
| 3 | 3 | 146.200 | 7.00 |
| 4 | 4 | 156.490 | 8.00 |
| 5 | 5 | 149.223 | 7.00 |
| 6 | 6 | 119.000 | 6.00 |
| 7 | 7 | 118.030 | 6.00 |
| Total | | 1523.905 | 76.00 |

तहसिल ब्रम्हपुरी

रा.मा.क्र.12/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- नवेगांव मक्ता तालुका:- ब्रम्हपुरी
**EQJ Court No. 00240/2021**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. अकृषक दर (0.05 पैसे प्र.चौ.मि.प्रमाणे) | :- | रुपये 76/- | प्रती वर्ष |
| 2. जि.प.कर (अकृषक कराचे 7 पट) | :- | रुपये 532/- | प्रती वर्ष |
| 3. ग्रामपंचायत कर (अकृषक कराचे 1 पट ) | :- | रुपये 76/- | प्रती वर्ष |
| एकुण रुपये | :- | रुपये 684/- | प्रती वर्ष |

**अटी व शर्ती :-**

1. सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपुर यांनी त्यांचे दिनांक 05/10/2021 व 23.11.2021 चे शिफारस पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील. तसेच कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांचे पत्र दिनांक 01.11.2021 व वरील सर्व विभागाचे अभिप्राय / नाहरकत प्रमाणपत्रा मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
2. आदेशाचे दिनांकापासुन एक वर्षाचे आंत जमीन भुपरावर्तीत करावयांस पाहिजे तसे न झाल्यास परवानगीची मुदत वाढवुन घेण्यांस या कार्यालयाकडे विनंती करावी. विनंती लेखी स्वरुपात असावी अन्यथा दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल.
3. अनुग्राही यांनी निवासी अकृषक वापरास परवानगी मिळाल्याचे दिनांकापासुन दरसाल प्रचलीत रुपये 0.05 न.पै.प्रती चौ.मी.दराने आकारणी दरात वेळोवेळी अंमलात येणारा अकृषिक दर पुर्वलक्षी पध्दतीने जरी हमी कालावधी संपुष्टात आला नसला तरी लागु झाल्यास तो भरण्यांस बंधनकारक राहील तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 नुसार सुधारणा करण्यांस पात्र राहील.
4. प्रकरणातील सर्व संबधीत विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मधील अटी/शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.
5. अभिन्यासातील सोडण्यांत आलेली रस्ते व खुली जागा (ओपन स्पेस) सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपूर यांचे निर्देशाप्रमाणे कायम ठेवणे आवश्यक राहील.
6. सदर प्रकरणातील भुमापन क्रमांक 82 आराजी **0.43** हे. आर. **पैकी 0.29** हे. आर. चे अभिन्यासाचे निवासी भुखंडा खालील एकूण क्षेत्रफळ **1523.905** चौ.मी. आहे. सदर क्षेत्राच्या 10 **टक्के** क्षेत्र 152.390 चौ. मी. इतके होईल. 152.390 **चौ.मी.** क्षेत्राचे भुखंड राखीव ठेवावयाचे झाल्यास भुखंड क्रमांक 2 यांचे एकुण क्षेत्र **153.600** चौ. मी. वर्ग आहे. सदर अभिन्यासाच्या जागेवर रस्ता, विद्युत, पिण्याचे पाणी व सांडपण्याची व्यवस्था या किमान नागरी सुविधा जमिन मालकाने / विकासकाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या सुविधा संबंधित अभिन्यासामध्ये उपलब्ध करुन दिल्याबाबत **तहसीलदार,** ब्रम्हपुरी कडून तपासणी करुन उपरोल्लेखीत भुखंड क्रमांक 2 च्या विक्रीबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. सदर नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुय्यम निबंधकाद्वारे सदर भुखंडाच्या विक्रीची नोंद करण्यात येईल.
7. सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपुर यांचे पत्र जा.क्र.अकृषी/अंतिम मंजुरी/मौ.नवेगांव मक्ता /ता.ब्रम्हपुरी/ससंनरचं/ 2377 दिनांक 23.11.2021 अन्वये विषयांकीत जागेतुन विद्युत वाहिनी जात असून सदर विद्युत वाहिनी अदयाप स्थानांतरीत झालेली नसल्याने सदर विदयुत वाहिनीमुळे बाधित होणारे भुखंड क्र. 1 हया भुखंडाची विक्री सदर विदयुत वाहिनी स्थानांतरीत केल्याशिवाय विक्री करता येणार नाही अशी शिफारस केलेली असल्याने विदयुत विभागाकडून सदर विदयुत वाहिनी स्थानांतरीत केल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करुन भुखंड क्रमांक 1 च्या विक्रीबाबत नाहरकत प्रमाणपत्र या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावे. सदर नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दुय्यम निंबंधकाद्वारे सदर भुखंडाच्या विक्रीची नोंद करण्यात येईल.
8. अकृषीक आदेश मिळाल्यानंतर आदेशापासुन एक महिण्याचे आंत कलम 44 (6) अन्वये सनद कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह हजर राहावे. सनद कार्यान्वीत न केल्यास हा अकृषीक परवानगीचा आदेश रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

रा.मा.क्र.12/एन.ए.पी.34/2021-2022
मौजा:- नवेगांव मक्ता तालुका:- ब्रम्हपुरी
EQJ Court No. 00240/2021

9. शासन निर्णय क्र.ग्रा.पा.क्रं.1001/एक-330/प्र.क्र.7 दिनांक 14.2.2002 नुसार अभिन्यास क्षेत्रात पडणारे पावसाचे पाणी आणि घरगुती वापराचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात भुगर्भात जिरविण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यांत यावे.
10. सदर अभिन्यासातील कोणतीही जागा वाणिज्य / औद्योगिक / धार्मीक प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.
11. सदर जागेबाबत न्यायालयात वाद असल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

तहसीलदार, ब्रम्हपुरी

तहसिलदार ब्रम्हपुरी

प्रतिलिपी : माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

1. सहाय्यक संचालक, नगर रचना, मुल्यांकन, प्रशासकीय इमारत क्रं. 2, तळमजला, अ विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001
2. उपअधिक्षक भुमी अभिलेख, ब्रम्हपुरी यांना वरप्रमाणे उचित कार्यवाहीस अग्रेषित. सोबत अभिन्यास जोडलेला आहे. अर्जदार **सौ. अंजली आशिष करंडे व इतर 1 रा. ब्रम्हपुरी तह. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर** यांचे नांवाने कमी जास्त पत्रक तयार करुन सादर करावे.
3. सहाय्यक संचालक नगर रचना, चंद्रपूर यांना माहितीस अग्रेषित.
4. दुय्यम निंबधक ब्रम्हपुरी यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित. आपणांस सुचित करण्यात येते की, आदेशातील सर्व अटीसह अट क्रमांक **6 व 7** चे पालन होईल याची दक्षता घ्यावी.
5. तलाठी साजा क्रं. **6 कुर्झा ता. ब्रम्हपुरी** यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित. सोबत अभिन्यास जोडलेला आहे.
6. ग्रामपंचायत कोथुळणा (मक्ता) ता. **ब्रम्हपुरी** यांनी खुली जागा व रस्ते हस्तांतरीत करुन घेण्याची कार्यवाही करावी.
7. व.बा.न. लिपीक तहसील कार्यालय, ब्रम्हपुरी यांनी सदर आदेशाची नोंद तालुका नमुना-2 मध्ये घेऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.
8. **सौ. अंजली आशिष करंडे व इतर 1 रा. ब्रम्हपुरी** तह. ब्रम्हपुरी **जिल्हा चंद्रपूर** यांना माहितीस अग्रेषित.
9. कार्यालयीन प्रत.

तहसीलदार, ब्रम्हपुरी